# <u>महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ</u>

**<u>परिपत्रक</u>**

मका/ग्रंथालय/१६-१७/१४०

दूरध्वनी क्र : ०२२-२४३०६७१७/४३२२६८२५
फॅक्स क्र.: ०२२-४२२१००१९
ई-मेल : pro.mlwb-mh@gov.in

हु.बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन (प), मुंबई - ४०० ०१३

दिनांक - १३ ऑक्टोबर २०१६

**<u>विषय : ग्रंथालयांकरिता दिवाळी अंक खरेदी करणेबाबत.</u>**
**संदर्भ : मा.कल्याण आयुक्तांनी दि.१०.१०.२०१६ रोजी मान्य केलेली टिप्पणी.**

मंडळाच्या ग्रंथालयांकरीता दिवाळी अंक खरेदी करण्यास या परिपत्रकाद्वारे कायमस्वरुपी मान्यता व मंजुरी देण्यात येत आहे. ज्या ग्रंथालयांतील सभासद संख्या ३१ पेक्षा जास्त व ५५ पेक्षा कमी आहे, अशा ग्रंथालयांसाठी १० दिवाळी अंक आणि ५६ पेक्षा जास्त सभासद संख्या असणा-या ग्रंथालयांकरिता १५ दिवाळी अंक खरेदी करावेत.

विभागीय कार्यालयांनी दरवर्षी ग्रंथालयांकडून एप्रिल ते सप्टेंबरपर्यंतचा सभासद संख्येचा तपशिल मागवून घ्यावा. सभासद संख्येची खात्री झाल्यानंतर ग्रंथालयांकरिता वरील तपशिलाप्रमाणे दिवाळी अंक खरेदी करण्यास केंद्रांना मान्यता द्यावी. विभागीय कार्यालयांद्वारे दरवर्षी निर्गमित करण्यात येणाऱ्या दिवाळी अंक खरेदीच्या मंजुरीपत्रकाची प्रत माहितीस्तव मध्यवर्ती कार्यालयास सादर करावी. मंजुरीपत्रकात ग्रंथालयाचे नाव, सभासद संख्या व दिवाळी अंकांची नावे यांचा उल्लेख असावा.

सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे स्थानिक विक्रेत्यांकडून किमान १० टक्के सवलतीत केंद्रस्तरावर दिवाळी अंक खरेदी करावेत. गट कार्यालयांनी सदर रकमेचे धनादेश संबंधित विक्रेत्यास उपलब्ध करुन द्यावेत. सदर खर्च दरवर्षी **केंद्रांर्तगत वाचनालये** या सदरी खर्ची घालण्यात यावा.

<u>सदरचे परिपत्रक चालू आर्थिक वर्ष २०१६-१७ पासून पुढील आदेश निघेपर्यंत अंमलात राहील.</u>

**<u>सोबत :</u>** <u>दिवाळी अंकाची यादी.</u>

प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी
कल्याण आयुक्तांकरिता

**प्रत :**

१. सर्व अधिकारी, म.का.,मुंबई
२. सहायक कल्याण आयुक्त, कामगार क्रीडा भवन, मुंबई
३. सहायक कल्याण आयुक्त, सर्व विभागीय कार्यालये
४. सहा.लेखा अधिकारी, सर्व विभागिय कार्यालये
५. कामगार कल्याण अधिकारी, सर्व गट कार्यालये
६. सर्व केंद्र संचालक
७. कल्याण आयुक्तांचे स्वीय सहायक, म.का., मुंबई

**<u>सूचना</u>** <u>: गट कार्यालयांनी आपल्या अंतर्गत येणा-या केंद्रांना सदर परिपत्रक निर्गमित करावे.</u>

| अ.क्र. | दिवाळी अंकांचे नाव | अ.क्र. | दिवाळी अंकांचे नाव |
|---|---|---|---|
| १. | कथाश्री | २३. | अमृत |
| २. | मौज | २४. | आवाज |
| ३. | साधना | २५. | उद्योजक |
| ४. | सत्याग्रही | २६. | पर्यटन |
| ५. | आवाज | २७. | भटकंती |
| ६. | जत्रा | २८. | आपले छंद |
| ७. | रुचिपालट | २९. | किस्त्रिम |
| ८. | गृहशोभा | ३०. | दक्ष |
| ९. | गृहशोभिका | ३१. | श्री दीपलक्ष्मी |
| १०. | माहेर | ३२. | नवल |
| ११. | अबोली | ३३. | उत्तमकथा |
| १२. | ऋतुरंग | ३४. | लोकप्रभा |
| १३. | मिळून सा-या जणी | ३५. | लोकसत्ता |
| १४. | श्री तशी सौ | ३६. | महाराष्ट्र टाइम्स |
| १५. | चारचौघी | ३७ | साप्ताहिक सकाळ |
| १६. | धनुर्धारी | ३८ | लोकमत दीपोत्स्व |
| १७. | चित्रलेखा | ३९ | सामना |
| १८. | गमंत जमंत | ४० | ॲग्रोवन |
| १९. | किशोर | ४१ | कालनिर्णय |
| २०. | शतायुषी | ४२ | ललित |
| २१. | भटकंती | ४३ | धन्वंतरी |
| २२. | मार्मिक | ४४ | किसान |